भिवंडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ४३ /२०२६ दि. २० /०२/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, भिवंडी वाहतूक उपविभागाचे हद्दीत दि. २१/०२/२०२६ रोजी मा. श्री राहुल गांधी, मा. खासदार हे कोर्ट केसच्या सुनावणीसाठी भिवंडी न्यायालयात हजर राहणार आहेत. नमुदवेळी मोठया प्रमाणात वाहनांची ये–जा होणार असुन सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** भिवंडी शहरात गुजरात वाडा कडुन येणाऱ्या व नाशिक मुंबई अंजूरफाटा कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना **वंजारपट्टी नाका उड्डाणपूलावरून भिवंडी शहरात 'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	**अ)** सदर अवजड वाहने वंजारपट्टी पूलावरून डावीकडे वळण घेवून चाविंद्रा मार्गे वडपे येथुन मुंबई नाशिक महामार्गावरून इच्छीत स्थळी जातील.
	ब) वसई अंजूरफाटाकडे जाणारी वाहने चाविंद्रा येथून नाशिक मुंबई महामार्गावरून मानकोली मार्गे इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** कल्याण तसेच मुंबई कडून वाडा गुजरात कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना **रांजनोली नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने रांजनोली नाका कडून मुंबई नाशिक महामार्गावरून वडपे येथून डावीकडे वळण घेवून चाविंद्रा वंजारपट्टी ब्रिज मार्गे वाडा गुजरातकडे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**३)** अंजुरफाटा मार्गे वाडा गुजरात अथवा नाशिककडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना **अंजुरफाटा** येथे 'प्रवेश बंद' करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	**अ)** सदर वाहने अंजुरफाटा वरून मानकोली मार्गे मुंबई नाशिक महामार्गाने इच्छित स्थळी जातील. **ब)** वाडा गुजरात कडे जाणारी वाहने वडपे – चाविंद्रा – वंजारपट्टी उड्डाणपूल मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**४)** तळवली नाका कडून भिवंडी शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या अवजड वाहनांना **तळवली नाका** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने तळवली नाका कडून खोणीगाव – पारोळ फाटा – वंजारपट्टी उड्डाणपूलावरून चाविंद्रा मार्गे नाशिक हायवेने इच्छित स्थळी जातील.

सदर अधिसुचना दि. २१/०२/२०२६ रोजी सकाळी ०९:०० ते व्ही.आय.पी.चें निर्गमन होई पर्यंत अंमलात राहील.
सदर अधिसुचना फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, पोलीस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.

मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे.
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १,२,३.
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे/भिवंडी/कल्याण डोंबिवली.
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे.
नियंत्रण कक्ष, ठाणे शहर
ठाणे पोलीस पत्रक.

प्रत :– समन्वय अधिकारी ९ ए. एस. कक्ष, ठाणे.
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी,
संबंधित सपोआ, वाहतूक विभाग व प्रभारी अधिकारी, वाहतूक उप विभाग, ठाणे शहर.